महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

(महाराष्ट शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यापीठ मार्ग, शिवाजीनगर पुणे- ४११०१६

दुरध्वनीक्र. ०२०-२५६७६८१८, २५५५९२०० Email:-

principal.gppune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शातंपु/विवि/सूचना/२०२१/१३६ दिनांक : 05 JAN 2022

## सूचना

**विषय** :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजनेच्या सन २०२१ -२२ साठीच्या अंमलबजावणीसाठी.

शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ मधील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या मार्फत प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजना राबवली जात आहे. दि १५/०१/२०२२ पुर्वी विद्यार्थ्यांनी आपला शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे आवश्यक आहे. तसेच सन २०२० -२१ मधील शिष्यवृत्ती मंजुर झालेल्या पात्र विद्यार्थ्यांनी नुतनीकरण (Renewal) अर्ज अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन भरावेत.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे संकेतस्थळावर www.scholarship.gov.in ऑनलाईनरित्या राबविण्यात आलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी अर्ज अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन भरावेत.

एका शैक्षणिक वर्षात केंद्र शासनाच्या NPS पोर्टल व महाराष्ट्र शासनाच्या DBT पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाचं योजनेचा लाभ घेता येईल.

**अ) प्रगती शिष्यवृत्ती मिळण्यासाठीचे निकष - विद्यार्थीनीसाठी**

१. विद्यार्थ्यांचे पालकांचे कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रु.८.०० लाखापर्यत असावे.
२. सदर योजना ही एका कुटूंबातील दोन मुलीना लागू राहील.

**ब) सक्षम शिष्यवृत्ती मिळण्यासाठीचे निकष - विषेश दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी**

१. विद्यार्थ्यांचे पालकांचे कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रु.८.०० लाखापर्यत असावे.
२. दिव्यांगत्वाचे प्रमाण ४०% किंवा त्यापेक्षा अधिक असावे.

5/1/2022

(डॉ.विठ्ठल श्रीरंग बांदल )
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे प्रत

प्रत : १. सर्व विभाग प्रमुख,
यांना कळविण्यात येते त्यांनी सदरील सुचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी व आपल्या विभागाच्या सुचना फलकावर लावण्यात यावी.
२. विभाग प्रमुख संगणक, त्यांना विनंती करण्यात येते की, १५ जानेवारी २०२२ पर्यंत संस्थेच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

(महाराष्ट शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यापीठ मार्ग, शिवाजीनगर पुणे- ४११०१६

दुरध्वनीक्र. ०२०-२५६७६८१८, २५५५९२०० Email:-

principal.gppune@dtemaharashtra.gov.in

---

जा.क्र.शातंपु/विवि/सूचना/२०२१/ १३८ दिनांक : 05 JAN 2022

**सूचना**

**विषय** :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या स्वनाथ शिष्यवृत्ती योजनेच्या सन २०२१ -२२ साठीच्या अंमलबजावणीसाठी.

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, जे विद्यार्थी अनाथ आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे आई-वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोविड-१९ मध्ये मृत्युमुखी पडले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या मार्फत **स्वनाथ** शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ पासून राबवली जात आहे. सदर योजनेकरीता **दिं १५/०१/२०२२** पुर्वी विद्यार्थ्यांनी आपला शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे आवश्यक आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे या (संकेतस्थळावर www.scholarship.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात आलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज भरावेत.

उपरोक्त योजनेची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ www.aicte-india.org वर देण्यात आलेली आहे.

एका शैक्षणिक वर्षांत केंद्र शासनाच्या NPS पोर्टल व महाराष्ट्र शासनाच्या DBT पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाचं योजनेचा लाभ घेता येईल.

**अ) स्वनाथ शिष्यवृत्ती मिळण्यासाठीचे निकष -**

१. पालकांचे कुटूंबाचे सर्व स्त्रोतांमार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न ( दोन्ही पालकांचे एकत्रित ) रु.८.०० लाखापर्यत असावे.

5/1/2022

(डॉ.विठ्ठल श्रीरंग बांदल )
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

प्रत : १. सर्व विभाग प्रमुख,
यांना कळविण्यात येते त्यांनी सदरील सुचना विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणून दयावी व आपल्या विभागाच्या सुचना फलकावर लावण्यात यावी.

२. विभाग प्रमुख संगणक, त्यांना विनंती करण्यात येते की, १५ जानेवारी २०२२ पर्यंत संस्थेच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करण्यात यावी.